# सहकारासाठी भारताच्या राज्यघटनेतच दुरूस्ती



भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व गणराज्य देश आहे. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक या तिन्ही गोष्टींसाठी न्यायव्यवस्था आपल्या राज्यघटनेत आहे. आपल्या देशात विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य आहे. योग्य दर्जाची व संधीची समानता आपल्या राज्यघटनेत अंतर्भूत आहे. त्यासाठी सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देण्यासाठी बंधुत्व, राज्यघटनेत विस्तृतपणे मांडली आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राज्याचा कारभार, शिक्षण व न्यायदान हे महत्त्वाचे अंग असून त्यासाठी भारताचे संविधान स्वयंपूर्ण आहे. आणि म्हणूनच भारत देशातील शहरापासून गाव खेड्यापर्यंत पसरलेला 'सहकार' हा महत्त्वाचा विषय राज्यघटनेत दुर्लक्षीत करून चालणार नाही किंबहुना याची आवश्यकताच आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकार ज्या विषयावर कायदे करू शकतात, त्याचे विवेचन राज्यघटनेत आहे. त्यानुसारच '**सहकारी संस्था**' हा राज्यसरकारच्या अखत्यारितला विषय असून प्रत्येक राज्याचे विधिमंडळ **सहकार** या विषयावर कायदा करते. जसा महाराष्ट्र राज्यात **महाराष्ट्र सहकारी कायदा १९६०** हा कायदा महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाने अस्तित्वात आणला. सहकारी चळवळ ही जागतिक चळवळ आहे. जागतीक स्तरावर १५० वर्षांहून जास्त काळ सहकाराचा इतिहास उपलब्ध आहे. आपल्या भारत देशात या सहकाराची नुकतीच शताब्दी संपन्न झाली. जगातल्या प्रत्येक देशातल्या सहकारी चळवळीने सहकारी तत्त्वांचे पालन करावे ही सर्वमान्य अपेक्षा आहे. आपल्या देशातील विविध राज्यातील सहकारी कायदे एकमेकांशी सुसंगत नाहीत. यासाठी भारत सरकारने अशा सुसंगत नसणाऱ्या सहकार कायद्यातील तरतुदी वगळण्यासाठी यापुर्वी कळविले आहे. **सन १९९० साली चौधरी ब्रम्हप्रकाश** यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय स्तरावर एक समिती नेमली होती. आणि या समितीने एक ''**सहकारी आदर्श कायदा**'' तयार सुध्दा केला होता. **परंतु भारतातील राज्य सरकारांनी या मॉडेल ॲक्टची दखल घेतली नाही.** म्हणून केंद्र सरकारने भारताच्या राज्यघटनेतच दुरूस्ती करण्याचे ठरवून ''**सहकार**'' **हा विषय केंद्र सरकारच्याही अखत्यारित असेल अशी, दुरूस्ती डिसेंबर २०११ मध्ये लोकसभेने संमत केली.** त्यामुळे केंद्राला राज्य सरकारांना त्या-त्या

राज्याच्या सहकारी कायद्यात स्पष्टपणे दुरूस्त्या करण्याचा अधिकार प्राप्त झाला. **एवढेच नव्हे तर तो प्रत्येक राज्याने पाळने बंधनकारक असेल,** अशी तरतूदही त्या प्रस्तावित राज्यघटनेत दुरूस्ती केली. त्यामध्ये ज्या तरतुदी सुचविलेल्या आहेत, त्याचा थोडक्यात तपशील या अग्रलेखात मांडीत आहोत.

राज्य घटनेतील विभाग-४ चे कलम ४३ ब मध्ये दुरूस्ती सुचविली आहे..........

**राज्य घटनेतील विभाग-४ कलम ४३ ब:**

सरकार (राज्य व केंद्र) सहकारी सोसायट्यांच्या उभारणीत लोकांचा स्वयंपुर्ण सहभाग असेल याची काळजी घेईल. या संस्थांचा कारभार लोकांच्या हाती असेल, त्यावर लोकांचे लोकशाही नियंत्रण असेल आणि व्यावसायिक नियंत्रण असेल. या तरतुदीचा अभ्यास करता महाराष्ट्र सहकारी कायद्यांत काही बदल करणे आवश्यक ठरेल. **कलम १४ मधील पोटनियमांत बदल करण्याचा आदेश देण्याचा अधिकार व जरूर तर सक्तीचे आदेश देण्याचा तरतुदींचा विचार करावा लागेल.**

घटनेत पार्ट ९ अ नंतर (महानगरपालिका) पार्ट ब चा नव्याने समावेश करून त्याला सहकारी सोसायट्या असे शीर्षक दिले आहे. **पार्ट ९ अ मध्ये कलम २४३ पी ते २४३ झेड.झी. नंतर कलम २४३ झेड.एच. ते २४३ झेड.टी. या कलमांचा समावेश केला आहे. त्यांचा गोषवारा व त्याला अनुलक्षून महाराष्ट्रात सहकारी कायद्यांत करावयाचे बदल याचा विचार खाली दिला आहे.**
**कलम २४३ झेड.एच.** मध्ये अधिकृत व्यक्ती, बोर्ड, को-ऑपरेटिव्ह सोसायटी, मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी पदाधिकारी,रजिस्ट्रार (निबंधक), राज्याचा कायदा, राज्यस्तरीत सहकारी संस्था यांच्या व्याख्या दिल्या आहेत. कलम **२४३ झेड. आय.** मध्ये असे म्हटले आहे, घटनेतील या तरतुदी विचारांत घेऊन राज्यांना आपल्या सहकारी कायद्यांत सहकारी संस्थांची नोंदणी, नियमन व अवसायन यासंबंधीच्या तरतुदी करतांना **सहकाराची सात तत्त्वे विचारांत घ्यावी लागतील.** त्यात लोकांनी स्वत: पुढाकार घेऊन सहकारी संस्था स्थापन करणे, तिच्यावर तिच्या सभासदांचे लोकशाही नियंत्रण असणे, तिच्या व्यवसायांत सभासदांचा आर्थिक सहभाग असणे, तिच्या व्यवसायांत सभासदांचा आर्थिक सहभाग असणे आणि त्याचा कारभार स्वयंशासित असणे गरजेचे राहील. महाराष्ट्र सहकारी कायद्यातील कितीतरी तरतुदी या निकषांवर बदलाव्या लागतील.

**कलम २४३ झेड.जे** नुसार सोसायटीच्या **संचालक मंडळाची संख्या** ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारचा असेल. मात्र ही **२१ पेक्षा अधिक असणार नाही.** संचालक मंडळात **मागासलेल्या जमातीसाठी एक जागा, महिलांसाठी दोन जागा राखीव राहतील. याचा अर्थ ओबीसी,**

<u>**ईबीसीसाठी वेगळ्या राखीव जागा असणार नाहीत.**</u> **संचालक मंडळाचा व पदाधिकाऱ्यांचा कालावधी सारखाच म्हणजेच पाच वर्षांचा राहील.** संचालक मंडळातील रिकामी जागा संचालक मंडळास त्याच्या मूळ कालावधीच्या निम्म्यापेक्षा कमी कालावधीसाठी राहिल्यास स्विकृतीने भरता येईल.

राज्याच्या विधीमंडळात तरतूद करून संचालक मंडळावर बँकिंग, व्यवस्थापन, फायनान्स अथवा सोसायटीच्या कामकाजाशी संबंधित विषयातील अनुभव असणाऱ्या इसमास स्विकृत संचालक म्हणून स्विकृत करण्याची तरतूद करता येईल. अशा स्विकृत संचालकांची संख्या दोन पेक्षा अधिक असणार नाही. तसेच अधिकची असेल म्हणजे एकवीस अधिक दोन. (२१+२) **स्विकृत संचालकांना पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. तसेच त्यांना पदाधिकारी म्हणून निवडून येता येणार नाही,** याशिवाय बँकेतील ज्या सेवकांना फंक्शनल डायरेक्टरची कामे करावी लागतात ते संचालक मंडळाचे पदसिध्द सदस्य असतील , पण त्यांना पदाधिकारी निवडणुकीत भाग घेता येणार नाही.

**कलम २४३ झेड. के.:** विद्यमान संचालकांचा कालावधी संपण्यापुर्वी नवीन संचालक मंडळाची निवडणूक घ्यावी लागेल, जेणेकरून त्यांना प्रस्थापित मंडळाचा काळ संपतानांच त्यांची जागा घेता येईल. अशी निवडणूक घेण्याची जबाबदारी कायद्यातील तरतुदीनुसार संबंधितांना पार पाडावी लागेल. अशी निडवणूक आयोजनाची कार्यरिती कायद्यातच घालून दिली जाईल.

**कलम २४३ झेड.एल.: विद्यमान कायद्यात काहीही असले तरी संचालक मंडळाच्या बरखास्तीचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.** याचा अर्थ त्यापुर्वी निवडणूका पुर्ण व्हाव्या लागतील **संचालक मंडळ खालील कारणासाठी बरखास्त केले जाऊ शकेल.** १) त्यांनी आपल्या **कर्तव्यात वारंवार** कसूर केल्यास, २) आपली **कर्तव्ये करण्यात त्यांनी हलगर्जीपणा** केल्यास, ३) संस्थेच्या **हितसंबंधांस बाधा** येईल अशी कृत्ये त्यांनी केल्यास , ४) **संचालक मंडळ काम करीत नसेल**-कार्यरत नसेल तर, ५) विद्यमान संचालक मंडळाने कायद्यातील तरतुदीनुसार **मुदतीत नवीन संचालक मंडळाच्या निवडणुकीची कारवाई न केल्यास.**

मात्र, <u>**ज्या सहकारी संस्थेत शासकिय भाग भांडवल नसेल, सरकारी कर्ज घेतले नसेल, शासकीय अर्थ सहाय्य घेतले नसेल किंवा जिला सरकारची हमी कर्ज फेडीसाठी नसेल त्या संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करता येणार नाही.**</u>

याशिवाय आणखी असे की, बँकिंगचा व्यवसाय करणाऱ्या सहकारी सोसायटीला बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुदी लागू राहतील. याशिवाय आणखी असे की, **मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी खेरीज अन्य सहकारी संस्था ज्या बँकिंगचा व्यवसाय करीत असतील त्यांचे बाबतीत सहा महिने यांचे ऐवजी एक वर्ष असा शब्द घातलेला असेल.**

संचालक मंडळ बरखास्त केल्यामुळे सोसायटीचा कारभार करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाने विहित मुदतीत नवीन संचालक मंडळाची निवडणूक घेण्याची व्यवस्था करावयाची आहे /करणे आवश्यक आहे.

राज्य विधी मंडळाने कायद्यात तरतूद करून प्रशासकाच्या सेवा शर्तीचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**कलम २४३ झेड.एम. :** १) **राज्य विधी मंडळाने, सहकारी सोसायटीने आपले हिशोब (अकाऊंटस) कसे ठेवायचे व त्याची हिशोब तपासणी कशी करावयाची यासंबंधी कायद्यात तरतूद करणे आवश्यक आहे.** २) विधी मंडळाने कायद्यात लेखापरिक्षकांची लेखापरीक्षणाची किमान पात्रता व कामाचा अनुभव यासंबंधी तरतुद करावी. ऑडिट करणाऱ्या फर्मचीही पात्रता काय असावी ते द्यावयाचे आहे. ३) **प्रत्येक सहकारी सोसायटीने तिच्या साधारण सभेने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकांकडून लेखापरिक्षण करून घ्यावयाचे आहे.** मात्र असा लेखापरिक्षक किंवा लेखापरिक्षण फर्मचे राज्य सरकारने त्यासाठी तयार केलेल्या **पॅनेलमध्ये असणे आवश्यक आहे.** ४) आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्याचे आत प्रत्येक सहकारी संस्थेने आपले ऑडिट करवून घेतले पाहिजे. **कायद्याने शिखर संस्था म्हणून ठरविलेल्या शिखर संस्थेचा ऑडिट रिपोर्ट राज्य विधीमंडळासमोर सादर करणे आवश्यक असेल.**

**कलम २४३ झेड.एन.:** राज्य विधी मंडळाला कायद्यात तरतूद करून आर्थिक **वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांचे आत वार्षिक साधारण सभा घेण्यासंबंधी** व त्यासंबंधी करावयाच्या कामकाजाचा तपशील देतील.

**कलम २४३ झेड. ओ.:** १) सभासदांना त्यांच्या सहकारी संस्थेशी आर्थिक व्यवहाराच्या संस्थेने ठेवलेल्या नोंदी तपासून पाहण्याचा अधिकार असेल. याशिवाय सोसायटी दप्तर, अन्य माहितीही पाहण्याचा त्याला अधिकार असेल. कायद्यात तशी तरतूद केली जाईल. २) **सभासदाचा संस्थेच्या व्यवहारात सहभाग असेल,** तो असला पाहिजे. यासाठी कायद्यात तरतूद केली जाईल, ती **कमीत कमी किती सभांना तो उपस्थित पाहिजे. तसेच त्याने किमान किती रकमेचा व्यवहार**

**संस्थेशी केला पाहिजे.** ३) **<u>सभासदांना सहकाराचे शिक्षण-प्रशिक्षण दिलेच पाहिजे,</u>** <u>या संबंधीही तरतूद कायद्यात असेल.</u>

कलम २४३ झेड. पी. : प्रत्येक सोसायटीने **आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत** सरकारने निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडे आपल्या व्यवहारांची माहिती कळविली पाहिजे. त्या संस्थेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तिच्या आर्थिक व्यवहारांची लेखापरिक्षकाने तपासून दाखला दिलेली हिशोबाची पत्रके, **लाभांश वाटपासंबंधी साधारण मंजूर केलेल्या ठरावाची प्रत,** पोटनियम दुरूस्तीचे काही मंजूर प्रस्ताव असल्यास, ते साधारण सभेच्या आयोजनाची तारीख आणि असल्यास निवडणूकीच्या कार्यक्रमाचा तपशील, कायद्यातील तरतुदीप्रमाणे निबंधकांकडे पाठवावयाची अन्य माहिती इ. चा समावेश असावा.

**कलम २४३ खेड. क्यु.:** सहकारी संस्थांच्या कारभारातील अपराध व त्यासाठी शिक्षा यांचा तपशील दिला पाहिजे.

राज्य सरकारने केलेल्या सहकारी कायद्यात खालील बाबींवर, त्या केल्याबद्दल किंवा त्या करण्याचे टाळल्याबद्दलचा **अपराध व त्यासाठीची शिक्षा याचा तपशील असला पाहिजे.**

१) सहकारी सोसायटी, तिचा अधिकारी किंवा सभासद यांनी **चुकीची माहितीपत्रक पाठविली** किंवा **खोटी माहिती** दिली किंवा जी माहिती देणे **बंधनकारक आहे ती दिलीच नाही** हा अपराध होय.

२) या **कायद्यानुसार पालन करणे आवश्यक आहे अशा समन्सची / लेखी आदेशाची हेतुतः दखल न घेणे** किवा पालन न करणे हा गुन्हा होय.

३) **<u>सेवकांच्या वेतनात कपात केलेली रक्कम संबंधितांकडे चौदा दिवसांचे आत न पाठविणे,</u>** <u>हा संबंधितांचा गुन्हा होय.</u>

४) **संस्थेच्या अधिकारी किंवा अन्य कागदपत्रांचा** ताबेदार अशा पुस्तकांचा, हिशेबाचा, दस्तऐवजांचा, दप्तराचा, रोख रक्कम, सिक्युरिटीज किंवा अन्य मालमत्ता **यांचा ताबा हेतुतः देण्याचे टाळत असेल तर तो गुन्हा होय.**

५) जो कोणी **संचालकांच्या किंवा पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीपुर्वी,** निवडणूकीच्या काळात किंवा निवडणूकीनंतर **भ्रष्टाचाराचा अवलंब करीत असेल** त्याचे असे करणे हा अपराध होय.

**कलम २४३ झेड.आर.**

१) वरील तरतुदी मल्टीस्टेट को-ऑप. सोसायट्यांना लागू राहतील व जो राज्य सरकार, राज्य विधी मंडळ, राज्याचा कायदा असे उल्लेख असेल तेथे राज्यसरकारच्या ऐवजी केंद्र सरकार,

राज्याच्या कायद्याऐवजी केंद्राचा कायदा, राज्य विधीमंडळ याचे जागी लोकसभा -राज्यसभा असे समजण्यात येईल.

२) या तरतुदी केंद्रशासित प्रदेशालाही लागू होतील.

३) तसेच ज्या कोणत्या तरतुदी केंद्रशासित प्रदेशास लागू असणार नाहीत तसा उल्लेख संबंधित आदेशात केला जाईल.

**कलम २४३ झेड. टी. :** हा कायदा अंमलात येण्यापुर्वी राज्यांच्या कायद्यात यापेक्षा वेगळ्या तरतुदी असतील तर त्या बदलण्यात येईपर्यंत तशाच चालू राहतील.

एकंदरीत राज्यघटनेतच सहकारासाठी दुरूस्ती होत असल्यामुळे सहकारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना भविष्यकाळात प्रसंगी चांगले दिवस, तर प्रसंगी अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी या बदलाचे अभ्यासाअंती स्वागत व्हावे म्हणून आम्ही या दुरूस्त्यामध्ये आणखी काही अतिरिक्त सुधारणा सुचवित असून त्यामध्ये आपलाही सहभाग असावा, यासाठी आवाहन करीत आहे. कृपया तशा सुचना आपल्याकडे असल्यास आम्हांस सुध्दा ८ दिवसांचे आत जरूर लेखी कळवाव्यात, जेणेकरून त्यांचा अंतर्भाव करून पाठपुरावा करता येईल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**